म. ग्रं. सं. ठाणे
विषय निबंध
सं. क्र. ६८

REFBK-0002463

म. ग्रं. मं. ठाणें
विषय निबंध
सं. नं. ८८

टिळक सप्ताहानिमित्त

# लोकमान्य टिळकांची वेदविषयक कामगिरी.

लेखक:—के. ल. ओगले, बी. ए.

2843
REFBK-0002463

सन १९२४, शके १८४६.

किंमत २ आणे.

 2853

'अरे 'ला शास्त्रशुद्ध असें 'कारे ' म्हणावयाचें व आपल्या लोकांकडून म्हणवावयाचें हें लोकमान्यांच्या कर्तबगारीचें मुख्य ध्येय होतें; व मला वाटतें सामान्यपणें त्यांचें वाङ्मयविषयक कार्य व वेदवाङ्मयात्मक विशेष कार्य हीं देखील याच ध्येयानें प्रेरित झालेलीं होतीं. त्यांच्या ग्रंथांचें निरीक्षण त्यांच्या एकंदर कार्याच्या अनुरोधानेंच केलें पाहिजे व तसें केल्यानें याशिवाय दुसरें अनुमान निघणार नाहीं अशी माझी कल्पना आहे, व तिचेंच उद्घाटन प्रस्तुत लेखांत करण्याचा मीं यत्न केला आहे.

## पुढील ग्रंथ

लोकमान्यांचा दुसरा वेदविषयक ग्रंथ म्हणजे 'आर्क्टिक होम इन् धि वेदाज्' म्हणजे "आर्यांच्या ध्रुवाजवळील मूळ वसतीविषयीं वेदांतील पुरावा" हा होय. हा ग्रंथ १९०३ सालीं छापून सुप्रसिद्ध ताई-महाराजांच्या खटल्याचें एक अंग संपून लोकमान्यांना मुंबई हायकोर्टानें पूर्ण निर्दोषी म्हणून सोडण्याच्या सुमारास प्रसिद्ध झाला. या ग्रंथानें त्या वेळीं पुष्कळ खळबळ उडविली व लोकमान्यांच्या आधींच संपूर्ण देशव्यापी झालेल्या कीर्तीला त्यानें अधिक मोहकपणा आणिला. या वेळीं लोकमान्यांचें लक्ष नवीनच उपलब्ध झालेल्या खाल्डियन वाङ्मयाकडे लागलेलें होतें व १९०६ सालीं त्यांनीं मुंबईच्या फ्रामजी कॉवसजी हॉलांत झालेल्या व्याख्यानमालेंत या विषयावर एक व्याख्यानहि दिलें. दुर्दैवानें त्या व्याख्यानाला मीं हजर नव्हतों, पण 'टाइम्स ऑफ् इंडिया' पत्रांत प्रसिद्ध झालेला त्याचा सारांश वाचावयास मला मिळाला व त्यानंतर तीन चार दिवसांत लोकमान्यांची व माझी 'ओरायन' ग्रंथाच्या भाषांतरासंबंधीं जी मुलाखत झाली तींत त्यांनीं त्याचा उल्लेख केला होता. यानंतर १९१७ सालापर्यंत त्यांचे एतद्विषयक लेख किंवा भाषणें माझ्या पहाण्यांत किंवा ऐकण्यांत नाहींत. या सालीं पुण्यास भांडारकर ओरिएंटल रिसर्च इन्स्टिटयूटमार्फत जो एक प्राच्य विद्याविषयक निबंधांचा संग्रह डॉक्टरसाहेबांस त्यांच्या शिष्यांनीं व मित्रांनीं मिळून अर्पण

केला त्यांत लोकमान्यांनीं आपला शेवटचा लेख लिहिला आहे, व त्याला ' खाल्डियन ॲण्ड इंडियन वेदाज ' म्हणजे ' खाल्डियन आणि भारतीय वेद ' असें नांव दिलें आहे.

## लोकमान्यांचें धोरण

पुढील पिढ्यांच्या लोकांना लोकमान्यांच्या वेदविषयक कामगिरीचें एवढें स्वरूप पहावयास मिळणार आहे. त्याचें आतां संक्षेपतः विवेचन करूं. हे सर्व ग्रंथ व लेख आतां महाराष्ट्र भाषेंत सारांश रूपानें तरी उपलब्ध असल्यामुळें त्यांतील मजकूर सविस्तर सांगण्याचें प्रयोजन नाहीं. वर सांगितल्याप्रमाणें लोकमान्यांच्या चरित्राचें सूत्र त्यांच्या ग्रंथांतहि कसें दिसून येतें हें दाखविण्याचा माझा उद्देश असल्यामुळें त्याला अवश्य लागणाऱ्या तेवढ्याच गोष्टी साररूपानें यथाक्रम येतील. आतां आपण त्यांच्या ' ओरायन ' नामक पुस्तकाकडे वळूं. हें पुस्तक लिहिलें त्या वेळीं वेदकालासंबंधानें कोणतें मत प्रचलित होतां हें थोडें पाहिलें पाहिजे. त्या वेळीं हिंदी विद्वानांनीं या बाबतींत फारसा पायाशुद्ध विचार केलेला नव्हता. वेदकालासंबंधीं मुख्यतः दोन मतें त्या वेळीं प्रचलित होतीं. एक पुराणाभिमानी जुन्या पंडितांचें मत. या मताप्रमाणें पाहिल्यास वेद हे अनादि असून, परमेश्वराच्या मुखांतून निर्माण झालेले आहेत. धर्मदृष्ट्या जरी हें मत सोईचें व अवश्य असलें तथापि ऐतिहासिक व विवेचक दृष्टीला तें पटण्यासारखें नाहीं ही गोष्ट देखील कबूल केल्याशिवाय गत्यंतर नव्हतें. कारण याच्या उलट दुसरें जें पाश्चात्य विद्वानांचें मत त्याशीं टक्कर देण्याला त्यांच्याच कोटीक्रमाचा अंगीकार करणें अवश्य होतें. या पाश्चात्य मताचा असें दर्शविण्याचा प्रयत्न होता कीं, 'हिंदुस्थानांतील लोकाची सुधारणा उसनी असून, ती अगदीं अलीकडे अलीकडे पाश्चात्य लोकापासून उचललेली आहे; हिंदु लोकांना प्राचीन परंपरा नाहीं, त्यांचे धर्मग्रंथ जे वेद ते बायबलानंतर पुष्कळ वर्षांनीं पाश्चात्य देशांतील कल्पना घेऊन रचण्यांत आले, भगवद्गीता ग्रंथ बायबलावरून तयार झाला, हिंदी लोकांनीं अर्थात् पाश्चात्यांच्या

पुढें सर्व बाबतींत मान वाकविलीच अवश्य आहे, ज्यांना पूर्वेतिहास नाहीं, त्यांनीं पुढील वैभवाची व्यर्थ आशा कां करावी, आम्हींच झालें तर आपण होऊन तुमचें कल्याण करू शकूं, तेव्हां तुम्हीं आम्हीं सांगूं तसें वागा यांतच तुमचें हित आहे' एकीकडे अंधःश्रद्धाप्रेरित आमच्या जुन्या पंडितांचें एकदेशी मत, तर दुसरीकडे वैभवमदामुळें अंध झालेल्या पाश्चात्यांचे असे उर्मट प्रलाप अशी आमची प्रत्येक बाबतींत स्थिति होती. अशा या स्थितीला तोंड देण्याच्या प्रयत्न लोकमान्यांच्या पूर्वी थोडासा झालेला होता, पण गुरूवर शिष्यानें त्या बाबतींत ताण केल्याचें श्रेय लोकमान्यांस देणें अवश्य आहे. वेबर नामक जर्मन पंडितानें 'भारतीय वाङ्मयाचा इतिहास' लिहितांना होमरच्या इलियड नामक काव्यावरून हिंदु लोकांनीं रामायण रचिलें अशी जी कोटी लढविली तिला न्यायमूर्ती तेलंगांनीं खरपूस पण शास्त्रशुद्ध उत्तर देऊन टाकिलें. ज. बा. मोडकप्रभृति विद्वानांनीं देखील अशा प्रकारचे प्रयत्न करून महाभारत, भारतीय ज्योतिर्ग्रंथ इत्यादि संबंधानें पायाशुद्ध अभिमान आपल्या लोकांत उत्पन्न केला. तथापि वेदग्रंथासंबंधानें पाश्चात्य विद्वानांच्या उल्लूपणाच्या कोट्यांना समर्पक उत्तर द्यावयाचें महत्त्वाचें काम लोकमान्यांच्या वांट्यास आलें, व दुसऱ्या कोणीहि केलें नाहीं इतक्या अप्रतिम रीतीनें त्यांच्या हातून तें तडीसहि गेलें, ही अपणां महाराष्ट्रीयांना अत्यंत अभिमानाची गोष्ट होय.

## ओरायनचा उद्देश

'ओरायन' अथवा वेदकालसंशोधन या पुस्तकाचा उद्देश लोकमान्यांनीं स्वतः सांगितला आहे, त्याचा मथितार्थ असाः—" वेदकाल संशोधनामध्यें भाषापद्धति व ज्योतिषपद्धति अशा दोन प्रमुख पद्धती आजवर पंडितांनीं स्वीकारल्या आहेत. पहिल्या म्हणजे भाषापद्धतींत वेदकाळाचे मंत्र, ब्राह्मण व सूत्र असे कोणी तीन, तर छंद, मंत्र, ब्राह्मण व सूत्र असे कोणी चार विभाग कल्पून प्रत्येक भागाला आपापल्या रुचिवैचित्र्याप्रमाणें २०० पासून ५०० पर्यंत वर्षे देत असल्यामुळें असल्या

अनिश्चित पद्धतीचा उपयोग वेदकालसंशोधनांत करणें वेडेपणाचें आहे. या पद्धतीचा उपयोग पाश्चात्य विद्वानांनीं करून त्यांत मॅक्स मुल्लरनें वेद कालाला आरंभ इ. स. पूर्वी १२०० ठरविला. तर हौ नांवाच्या दुसऱ्या पंडितानें इ. सनापूर्वी २४०० वर्षं ठरविला. दुसरी ज्योतिष पद्धत. हिचा उपयोग मुख्यतः हिंदी विद्वानांनीं केला असून तीवर पाश्चात्यांनीं पुष्कळ निरर्थक आक्षेप घेतले आहेत. त्यांच्या मतें ज्योतिष-विषयक ज्या गोष्टींवर हिंदी लोक इतकी भिस्त ठेवीत आहेत त्या म्हणजे संपात, अयनें इत्यादि गोष्टी वेदकालीन लोकांस यथार्थ माहीत असणेंच अशक्य मग त्यांवरून अनुमानें कसली काढतां ! पण हा पाश्चात्य पंडितांचा कोटीक्रम फाजील सावधपणाचा आहे. म्हणून वेद-संहिता व ब्राह्मणें व त्यांतल्या त्यांत प्राचीन असा जो ऋग्वेद त्यांतील वचनांवरूनच भारतीय वाङ्मयाचें प्राचीनत्व पूर्णपणें स्थापित करतां येतें ही गोष्ट आम्हांला दाखवावयाची आहे. गोडबोले, दीक्षित इत्यादि भारतीय विद्वानांना या बाबतींत जे प्रयत्न केले आहेत. त्यांचीच पुरवणी म्हणून हा आमचा प्रयत्न होय. ”

## वेदकालनिर्णयाची दिशा

या उद्देशनिवेदनात लोकमान्यांनीं पाश्चात्य पंडितांच्या ज्या आक्षेपांचा निर्देश केला आहे ते त्यांनीं ‘ ओरायन ’ ग्रंथांत सविस्तर खोडून टाकून भारतीय आर्यांची सुधारणापरंपरा केवळ कालची नसून फार प्राचीन म्हणजे इ. स. पूर्वी निदान ४००० वर्षां पलीकडची आहे असें सप्रमाण दाखविलें आहे ऋग्वेदादि प्राचीन ग्रंथांवरून भारतीय आर्यांचें ज्योतिषविषयक ज्ञान किती होतें हें स्पष्ट दाखवून त्या अन्वयें वेदकाळाची आद्य मर्यादा इ. स. पूर्वी ४००० वर्षांच्या अलीकडे येऊं शकत नाहीं, हें त्यांनीं अनेक वेदवचनें व वैदिक कथा यांचें स्पष्टीकरण करून व त्यांची प्राचीन पाश्चात्य देशांतील पुराण कथांशीं तुलना करून दाखविलें. राजकीय विषयाची फोड करतांना जसा त्यांचा कोटीक्रम अभेद्य व प्रतिपक्षीयांस निरुत्तर करणारा

असतो तसाच कोटिक्रम या ग्रंथांतहि त्यांनीं निदर्शनास आणिला आहे त्यांच्या कोटिक्रमाची दुसरी मौज अशी आहे कीं, त्या कोटिक्रमानें जो सिद्धांत ते स्थापित करूं पहातात, तो जणूं काय मूळचा आपला नसून दुसऱ्यांनींच काढिला आहे, व त्याचें हे जणूं काय थोडीशीं अधिक प्रमाणें देऊन समर्थन करीत आहेत असें लोकांना वाटावें. प्रथम अगदीं हलक्यासलक्या प्रमाणांचा उपन्यास करून प्रतिपक्षाला ते असें वाटावयास लावतात कीं, असल्या प्रमाणांनीं कसचा सिद्धान्त स्थापित होतो! पण लहानसहान अनेक प्रमाणें दिल्यावर असल्या एकेकट्या प्रमाणानें जरी आपला सिद्धांत खरा ठरला नाहीं तरी त्यांच्या सामुदायिक बलानें तो तसा ठरण्यासारखा आहे, अशा कोटिक्रमानें प्रतिपक्षीयाच्या मताला थोडा जोर येण्याच्या सुमारास एकादें बलवत्तर प्रमाण सोडून द्यावें व अशा रीतीनें विरोधी पक्षाला चीत केल्यावर शेवटीं पुनः अत्यंत बलिष्ठ अशा प्रमाणानें आपिल्या सिद्धांताचें गौरवपूर्वक मंडन करावं अशी लोकमान्यांच्या लेखनाची शैली त्यांच्या या पुस्तकांत स्पष्ट दिसत येत. ओरायन ग्रंथाचा उद्देश वेदकालाचें संशोधन करून युरोपीय पंडितांनी ठरविलेल्या वेदकालाच्या मर्यादा चुकीच्या असून, खरा वेदकाल फार प्राचीन आहे हें सिद्ध करावें असा आहे. ईजप्शन सुधारणा इ स. पूर्वी ५००० वर्षांची, खाल्डियन लोकांची सुधारणा त्याच सुमाराची, चिनी लोकांची सुधारणा जवळ जवळ अशीच प्राचीन, पण भारतीय आर्यांची परंपरा मात्र कालची व इतरांपासून उसनी घेतलेली, अशा प्रकारच्या पूर्वग्रहदूषित पाश्चात्य मतांच्या कोटिक्रमाला उत्तर देऊन वैदिक सुधारणा देखील ईजिप्त किंवा खाल्डियन सुधारणापेक्षां नसली तरी त्यांच्या इतकी तरी प्राचीन आहे हें दाखवून देणें हे लोकमान्यांच्या वेदविषयक कामगिरीचें मुख्य धोरण होय. वर एके ठिकाणीं वेदकालसंशोधनाच्या ज्या पद्धति सांगितल्या त्यांपैकीं भाषापद्धति ही अगदीच अनिश्चित अतएव कुचकामाची म्हणून सोडून लोकमान्यांनीं दुसऱ्या म्हणजे ज्योतिष पद्धतीचा स्वीकार केला. रात्र दिवस, चांद्र मास, ऋतुपर्यायात्मक वर्ष, ग्रहणचक्र, गुरु, शनि इत्यादिकांची राश्यात्मक

स्थिति इत्यादि जीं लहान लहान कालचक्रें आहेत त्यांवरून एकदोन पिढ्यांतील किंवा शेंपन्नास वर्षांतील एकाद्या काळाचा पत्ता लावतां येतो. उदाहरणार्थ एकाद्या मनुष्याच्या जन्मकालीन ग्रहस्थितीवरून त्याचा जन्मकाल समजतो, ही गोष्ट ज्योतिषशास्त्राची अगदीं थोडीशी माहिती असणारालाहि परिचित आहे. पण केवळ ग्रहस्थितीवरून फार प्राचीन काळांतील एकाद्या विशिष्ट गोष्टीचा वेळ नक्की निर्णीत करणें शक्य नसतें सर्व ग्रहांची अंशात्मक स्थिति समजल्यास हजार पांचशें वर्षांतील एकाद्या काळाचा निर्णय करतां येईल, पण अशी शास्त्रीय दृष्ट्या ग्रहांची अंशात्मक स्थिति प्राचीन ज्योतिषेतर ग्रंथांत सांपडणें अशक्य आहे. अर्थात् वेदांसारख्या अति प्राचीन ग्रंथाचा कालनिर्णय करतांना असलीं साधनें उपलब्ध नाहींत, हें जसें खरें तसें तीं उपलब्ध असतीं तरी त्यांवरून निश्चित अनुमानें काढतां येणें कठीणच झालें असतें हेंहि खरें. पण या लहान कालचक्रांशिवाय ज्योतिषशास्त्राला सुमारें २१००० वर्षांच्या दीर्घावधि कालचक्रांची माहिती आहे, आणि या चक्राच्या निरनिराळ्या स्थितीचें वर्णन प्राचीन ग्रंथांत सांपडल्यास त्यावरून त्या त्या ग्रंथाचा किंवा ग्रंथभागांचा कालनिर्णय स्थूल मानानेंच कां होईना, पण करतां येण्यासारखा आहे. पृथ्वीच्या दैनंदिन व वार्षिक गतींशिवाय तिच्या दाक्षिणोत्तर व्यासाला म्हणजे अक्षाला जी शंक्वाकार गति आहे तीमुळें दैनंदिन गतीमुळें होणाऱ्या अहोरात्रात्मक किंवा वार्षिक गतीमुळें होणाऱ्या द्वादशमासात्मक लहान कालचक्रांप्रमाणें २१००० वर्षांचें एक महान कालचक्र उत्पन्न झालेलें आहे. या चक्राला अयनचलनाचें किंवा संपातचलनाचें चक्र असें म्हणतात. या कालचक्रामुळें वसंत ऋतूंत, शरदृतूत तसेंच उत्तरायण किंवा दक्षिणायन होण्याच्या वेळीं, निरनिराळ्या काळीं निरनिराळीं नक्षत्रें सूर्याजवळ असतात, व अशीं नक्षत्रें त्या त्या ठिकाणीं असल्याचें वर्णन वैदिक ग्रंथांतून आढळल्यास ते ग्रंथभाग त्या काळाचे दर्शक होत असें मानावयास कांहीं प्रत्यवाय नाहीं. वैदिक धर्म यज्ञात्मक असल्यामुळें आणि यज्ञाच्या आरंभाला किंवा त्यांतील निरनिराळ्या विशिष्ट विधींना विशिष्ट काळाची आवश्यकता असल्यामुळें असल्या तऱ्हेचीं काल-निदर्शक वर्णनें वैदिक

वाङ्मयांत येणें अपरिहार्य आहे; ही गोष्ट देखील उघड आहे. तेव्हां या वैदिक ग्रंथांच्या कालाचा शोध करावयाचा तर भलत्याचं भाषादि आड-मार्गाला लागण्यापेक्षां या ज्योतिषविषयक वर्णनांच्या राजमार्गाचीं कास धरणेंच योग्य होय; व ही गोष्ट आपल्या विषयांतील सिद्धांतशोधनाला कशी मार्गदर्शक झाली हें लोकमान्यांनीं विषयोपन्यास करतांना फार सरस रीतीनें दाखविलें आहे. 'संवत्सरः प्रजापतिः' आणि 'प्रजापति-र्यज्ञः' या ब्राह्मणवचनांतर्गत समीकरणांवरून 'संवत्सर म्हणजे यज्ञ' हें समीकरण कसें सिद्ध होतें हें त्यांना यज्ञ व संवत्सर यांतील विविध अवयवांची देखील समीकरणें लावून स्पष्ट केलें. लोकमान्यांचा हा कोटीक्रम कोणालाहि मान्य होईल असाच आहे, व तो मान्य झाल्यावर पुढील पायरी म्हणजे विविध यज्ञ वर्णनांतील वचनांचा अर्थ लावणें ही होय.

## कृत्तिका॰काळ

ओरायन ऊर्फ वेदकालसंशोधन याग्रंथांत वेदकालाची मर्यादा इ. स. पूर्वी १४०० वर्षांपासून मागें नेत नेत ती इ. स. ६००० वर्षांपर्यंत नेऊन दाखविली आहे. वेदांग ज्योतिषांत 'प्रपद्येते श्रविष्ठादौ सूर्या चांद्रमसावु-दक्। सार्पार्धे दाक्षिणार्कस्तु माघश्रावणयाः सदा' या श्लोकांत जी अयन स्थिति सांगितली आहे तीवरून इ. स. पूर्वी १४०० वर्षांच्या सुमारास वेदांगज्योतिषाचा काल ठरवावा लागतो. कारण धनिष्ठांच्या आरंभीं माघांत सूर्य उत्तरेस वळतो असें त्यांत म्हटलें आहे. व अशी उत्त-रायणाची स्थिति इ. स. पूर्वी १४१० वर्षांच्या सुमारास असावी असें भारतीय ज्योतिषशास्त्रकार दीक्षित यांनींहि दाखविलें आहे. ( पान ८७, ८८ ). याशिवाय तैत्तिरीय संहिता, ब्राह्मण भारत इत्यादि ग्रंथांत नक्षत्र-चक्राला कृत्तिकांपासून आरंभ केलेला असणें, कृत्तिकांना नक्षत्रांचें मुख म्ह-णणें, देवनक्षत्रांचा आरंभ कृत्तिकांपासून होतो असें सांगणें व माघपौर्णि-मेला उत्तरायण सुरू होतें असें म्हणणें, या गोष्टी वसंत संपात कृत्तिकांत होता असें दर्शवितात, व त्या अन्वयें त्यांचा काळ इ. स. पूर्वी २५०० पर्यंत असला पाहिजे या काळाला म्हणजे इ. स. पूर्वी २५०० पासून

१४०० वर्षांपर्यंतच्या काळाला लोकमान्यांनीं कृत्तिकाकाळ असें नांव दिलें आहे.

## मृगशीर्ष काळ

याच्या पलीकडच्या काळीं वसंत संपात अर्थात् कृत्तिकांच्या मागें असला पाहिजे. याची मर्यादा लोकमान्यांनीं इ. स. पूर्वी ४००० पासून २५०० अशी ठरविली असून या काळाचीं ज्ञापकें वैदिक ग्रंथांत काय काय सांपडतात हें पहातांना मृगशीर्ष नक्षत्राचें दुसरें नांव जे आग्रहायणी त्याचा अर्थ हायनाचा म्हणजे वर्षाचा आरंभ करणारें असा आहे ही गोष्ट त्यांनीं उत्तम रीतीनें सिद्ध केली आहे आणि या आग्रहायणी शब्दाचें मूळ रूप आग्रयण असें होतें व ग्रीक ओरायन शब्द वैदिक आग्रयणाचेंच रूपान्तर होय असें दाखवून या गोष्टीला प्रत्यन्तरें म्हणून संस्कृत मृग आणि ग्रीक ओरायन या संबधाच्या अनेक कथांचें विवरण करून त्यांतील निकट साम्य त्यांनीं स्पष्ट केलें आहे. ओरायन ग्रंथाचा हाच मुख्य विषय असल्यामुळें त्याला मृगशीर्ष नक्षत्राचें ग्रीक नांव जें ओरायन तेंच आपल्या ग्रंथाला लोकमान्यांनीं दिलें आहे. या आग्रयण नांवावरून व तैतिरीय संहितेंतील 'मुखं वा एतत्संवत्सरस्य यत्फल्गुनीपूर्णमासः' या वचनाचा अर्थ फाल्गुनी पौर्णिमेला उत्तरायण होऊन वर्षारंभ होत असे असाच केला पाहिजे असें दाखवून वसंतसंपातीं मृग नक्षत्र होतें ही गोष्ट सिद्ध केल्यावर तिला आणली प्रत्यक्ष प्रमाण म्हणून 'सुपुप्वांस ऋभवः' इत्यादि ऋग्वेदाच्या पहिल्या मंडळांतील ऋचा ( १६१, १३ ) व दहाव्या मंडळांतील ( ८६ वें ) वृषाकपीचें सूक्त यांचें विवेचन केलें. पहिल्या ऋचेंत ऋतुदेवतांना श्वान वर्षाच्या आरभीं जागें करतो असें म्हटलें असून पुढील सूक्तांत वृषाकपि दक्षिणेकडे जातांना यज्ञ बंद पडतात, पण तो उत्तरेकडे आल्यावर यज्ञ पुनः सुरू होतात असें दर्शविलें आहे. या वर्णनांत श्वान म्हणजे मृगनक्षत्राजवळचा श्वानपुंज उर्फ व्याधनक्षत्राचा पुंज असून वृषाकपि म्हणजे सूर्य व तो मृगांत आला असतां वर्षारंभ होऊन यज्ञाना सुरवात होते आणि तो मावळतांना मृग उगवूं लागलें म्हणजे दक्षिणायन

झाल्यामुळें यज्ञ बंद पडतात असा अर्थ आहे. या मृगशीर्षकालाच्या विचारावरच या ग्रंथांत मुख्य भर दिला आहे.

## अदिति ऊर्फ पुनर्वसू काळ

याच्या पलीकडील काळाला अदितिकाळ असें नांव देऊन लोकमान्यांनीं त्यांच्या मर्यादा इ. स. ६००० ते ४००० म्हणजे पुनर्वसूंतून मृगांत वसंतसंपात येईपर्यंत अशा दिल्या आहेत. 'मुखं वा एतत् संवत्सरस्य यच्चित्रापूर्णमासः' या तैत्तिरीय संहितावचनावरून एका काळीं चित्रापूर्णमाशीं म्हणजे चैत्री पौर्णिमेला उत्तरायणीं वर्षारंभ होत असे असें म्हणावें लागतें. पण या उत्तरायणकालाच्या जोडीला बसणाऱ्या संपाताच्या काळाचे स्पष्ट उल्लेख वैदिक ग्रंथांत सांपडत नाहींत तथापि पुनर्वसूंत वसंत संपात होता अशीं अस्पष्ट ज्ञापकें कांहीं आढळतात. अदिति ही पुनर्वसूंची देवता असल्यामुळें तिच्यापासून यज्ञांना (अर्थात् संवत्सरांनाहि) आरंभ व्हावा असा तिला वर मिळाल्याची ऐतरेय ब्राह्मणांतील कथा, तसेंच 'उभयतः शीर्ष्णी' म्हणजे दोहोंकडून डोकें असलेली असें वाजसनेयी संहितेंतील तिचें वर्णन, अदितीपासून आदित्य म्हणजे सूर्य उत्पन्न झाले इत्यादि ऋग्वेदांतील वर्णन या गोष्टींवरून पुनर्वसूंतील वसंतसंपाताचें अनुमान करण्यास बराच आधार मिळतो, असें त्यांनीं म्हटलें आहे.

येथवर त्रोटक दिग्दर्शन केलेल्या वैदिक वचनांचा लाविलेला अर्थ बरोबर आहे असें समजल्यावर वर नमूद केलेले काळ निश्चित करणें कठीण नाहीं. हल्लींची वसंतसंपातबिंदूची स्थिति पूर्वाभाद्रपदांजवळ आहे, व संपातचलनाची गति साधारण मानानें दर वर्षास ५० विकला आहे. पूर्वा भाद्रपदांपासून कृत्तिकांपर्यंत, मृगापर्यंत आणि पुनर्वसूंपर्यंत स्थूलमानानें ६०,८७व११८ असे अंश धरिल्यास, व संपाताला एक अंश चालावयास ७२ वर्षें लागतात असें साधारण मानानें मानिल्यास हे काळ इ. स. पूर्वी ६५ × ७२–१९२०, ८७ × ७२–१९२०, आणि ११८ × ७२–१९२० असे स्थूल मानानें येतील

## या सिद्धांताचा परिणाम

ओरायन ग्रंथांत ज्या कोटिक्रमाचा लोकमान्यांनीं स्वीकार केला आहे त्याचें हें दिग्दर्शन झालें. आतां त्यानीं काढिलेल्या सिद्धान्ताचा परिणाम एतद्विषयक तत्कालीन ज्ञानावर काय व कसा होण्यासारखा होता हें त्यांच्याच शब्दांत सांगतों. ते म्हणतात "अशा रीतीनें आपल्या प्राचीन वाङ्मयांत आढळणाऱ्या गोष्टी व ज्योतिषविषयक उल्लेख यांच्या पूर्ण अनुरोधानें वेदकाल इ. स. पूर्वी ४००० वर्षांच्या सुमारास जर निश्चित केला, तर वेदकालासंबंधानें भारतीय व यूरोपीय आणि प्राचीन व अर्वाचीन पंडितांमध्यें प्रचलित असलेल्या गोष्टी व मतें यांचा अगदीं समाधानकारक रीतीनें उलगडा करतां येतो." या बाबतींत बायबलांतील जगदुत्पत्तीचा काळ आणि आमच्या ब्रह्मवाद्यांची वेदांच्या अनादित्वाची कल्पना यांची जी सांगड त्यांनीं घातली आहे ती फार मौजेची आहे. तिचा मतलब असा—"बायबलाच्या जुन्या कराराप्रमाणें पहातां जगाची उत्पत्ति इ. स. पूर्वी ४००० वर्षांच्या सुमारास झाली म्हणजे त्या ग्रंथकाराची प्राचीनत्वाची कल्पनाच त्या काळाच्या पलीकडे जाऊं शकली नाहीं. इ. स. पूर्वी ४००० वर्षांच्या पलीकडचें कांहींच न कळल्यामुळें जगाची उत्पत्तिच मुळीं तेव्हां झाली असें त्यानें ठरविलें. आपल्या ब्रह्मवाद्यांनींहि जवळ जवळ असाच प्रकार केलासें दिसतें. वेदकालांतील विशेष भरभराटीचा काळ म्हणजे इ. स. पूर्वी ४००० वर्षांच्या सुमाराचा किंबहुना त्याहूनहि प्राचीन असल्यामुळें त्यानंतर हजारों वर्षांनीं झालेल्या पाणिनी, जैमिनी इत्यादि ब्रह्मवाद्यांनीं वेद हे जगाच्या आरंभापासूनच चालत आलेले आहेत म्हणजे अनादि आहेत असें ठरविलें."

## दोन ग्रंथांतील दुवा

ओरायन किंवा वेदकाल-संशोधन या ग्रंथाचें स्वरूप येथवर सांगितलें. पण लोकमान्यांच्या आजतागाइतच्या वैदिक संशोधनाचा विचार करतां जर त्यांनीं अलीकडे त्याची द्वितीयावृत्ती काढली असती तर तिचा बराच भाग अगदींच निराळ्या स्वरूपांत दिसला असता. पण तसा योग येणें

नव्हतें. याच्या पुढचा ग्रंथ 'आर्क्टिक होम इन धि वेदाज' हा होय. याच्या नांवावरूनच त्यांतील सिद्धांताचा बोध होतो. आर्यवंशीय लोकांचें मूलस्थान एका काळीं उत्तर ध्रुवाजवळच्या प्रदेशांत होतें, व त्या काळींच्या खुणा वैदिक ग्रंथांत स्पष्ट दिसून येतात हें दाखवून देणें हा या पुस्तकाचा उद्देश आहे. या ग्रंथांत प्रतिपादिलेल्या सिद्धांताची कल्पना ओरायन ग्रंथ लिहीत असतानांच लोकमान्यांना आली असावी असें ओरायनाच्या निरीक्षणावरून अनुमान काढतां येतें. यज्ञ म्हणजे संवत्सराची प्रतिमा हें समीकरण सिद्ध करणाऱ्या दुसऱ्या प्रकरणांत उत्तरायणाच्या प्राचीन अर्थाचा विचार करतांना 'एकं वा एतद्देवानामहः। यत्संवत्सरः' या ब्राह्मणांतील वचनाचा त्यांनीं उल्लेख करून उत्तरायण म्हणजे आज समजतों त्याप्रमाणें मकरसंक्रमणापासून कर्कसंक्रमणाचा काळ असा प्राचीन आद्य अर्थ नसून वसंत संपातापासून शरत्संपातापर्यंतचा काळ असा तो अर्थ होता हें अनेक प्रमाणांवरून त्यांनीं सिद्ध केलें आहे. या वचनावरील टीपेंत ते म्हणतात (पान २९) "या वचनावरूनच एखादी उपपत्ति स्थापित करणें हें मोठें धाडस होईल. असल्या वचनांत ग्रथित झालेल्या दंतकथांवरून उत्तरध्रुवप्रदेश एके काळीं माणसांनीं वसलेले होते असें अनुमान कित्येक लोक काढतात; व दुसऱ्या अशाच कथांवरून दोन हिमकालांच्या मधील एका हिमांतर कालाचेंहि अस्तित्व कांहीजण अनुमानूं पहातात." या शब्दांवरून ध्रुवोपपत्तीची कल्पना तेव्हांहि त्यांच्या मनांत घुटमळत असावी असें दिसतें. याच प्रकरणांत सहा महिने निद्रेंत घालविणाऱ्या लोकांविषयीं हिरोडोटस नामक ग्रीक ग्रंथकारानें केलेल्या निर्देशाचाहि त्यांनीं उल्लेख केला आहे, व त्यावरूनहि वरील कल्पना दृढ होते. तथापि त्या वेळीं त्यांनीं या कल्पनेचा पुरस्कार करण्याइतका भरपूर पुरावा नसल्यामुळें ती तशीच सोडून दिली. शिवाय ज्या वैदिक ग्रंथांच्या परिशीलनाचें फल 'ओरायन' रूपानें त्यांनीं जनतेला अर्पण केलें तें परिशीलन जरी त्यांच्या अत्यंत आवडीचा विषय होतें तरी तें पुढें चालू ठेवतां येईल कीं नाहीं याबद्दल त्यांच्या मुख्य उद्योगा-

मुळें त्यांना संशयच होता; म्हणूनहि कदाचित् या कल्पनेला उगीच पुढें आणूं नये असें त्यांना वाटलें असेल.

## कारागृहवास व 'आर्क्टिक होम'चा गर्भवास

पण अकल्पित गोष्टी घडून येणें व त्यामुळें त्यांच्या तपाचा जोर वाढून त्याला अत्यंत तेजस्विता येणें हें लोकमान्यांच्या चरित्राचें एक रहस्यभूत अंगच दिसतें. त्याप्रमाणें ओरायन प्रसिद्ध झाल्यावर चार वर्षांच्या आंतच म्हणजे सुप्रसिद्ध १८९७ सालीं केसरी पत्रावर खटला होऊन त्यांना १८ महिन्यांचा कारागृहवास सोसण्याचा प्रसंग आला. लोकमान्यांनींच ओरायनाच्या प्रस्तावनेंत अखेर उद्धृत केलेल्या कालिदासाच्या 'हेम्नः संलक्ष्यते ह्यग्नौ विशुद्धिः श्यामिकाऽपि वा' या वचनांत सांगितल्याप्रमाणें लोकमान्यरूपी सुवर्णाची साहजिक विशुद्धिच या कारागृहवासरूपी अग्नींत जगाच्या निदर्शनास आली. सुप्रसिद्ध पाश्चात्य वैदिक पंडित प्रो. मॅक्स मुल्लर यांनीं आपण प्रसिद्ध केलेल्या ऋग्वेदाच्या दुसऱ्या आवृत्तीची एक प्रत त्यांच्याकडे पाठवून दिली, व सरकारनेंहि आपला कठोरपणा किंचित् सैल करून हें व दुसरीं कांहीं पुस्तकें रात्रीं वाचतां यावीं म्हणून दिवा वापरण्याची लोकमान्यांना परवानगी दिली. या वेळीं त्यांना आपल्या आवडत्या वैदिक ग्रंथाच्या परिशीलनाकडे पुनः वळावयास सांपडलें.

वैदिक कालाच्या निरनिराळ्या युगांविषयीं ओरायनमध्यें प्रतिपादिलेल्या सिद्धान्ताबद्दल वैदिक वाङ्मयाचा आस्थापूर्वक अभ्यास करणाऱ्या पाश्चात्य पंडितांना प्रथम बराच संशय होता. परंतु जर्मनींतील बॉन युनिव्हर्सिटींतील प्रो. याकोबी यांनी दुसऱ्या स्वतंत्र पुराव्यावरून जेव्हां तशाच प्रकारचे सिद्धांत स्थापित केलें, तेव्हां हळुहळु ब्लूमफील्ड, बार्थ बुल्लर इत्यादिकांनीं ओरायनांतील सिद्धांताची सत्यता प्रांजळपणें मान्य केली. पण डॉ. थीबो, डॉ व्हिट्ने इत्यादि पंडितांना ओरायनमधील प्रमाणें इतकीं निर्णायक वाटलीं नाहींत. पण "भारतीय ज्योतिःशास्त्र"-कार शं. बा. दीक्षित यांनीं आपल्या भारतीय ज्योतिःशास्त्राच्या इति-

ह्यांत 'कृत्तिकासु [ अग्निम् ] आदधीत । एताह वै प्राच्यै दिशो न च्यवन्ते । इतराणि ह वा नक्षत्राणि प्राच्यै दिशश्च्यवन्ते ।' या शतपथ ब्राह्मणांतील स्पष्ट वचनावरून त्या ब्राह्मणाच्या रचनाकाळीं कृत्तिका पुंज वसंतसंपाताजवळ होता असें निर्विवाद सिद्ध केल्यापासून डॉ. थीबोचे संशय निराधार ठरले व विद्यमान ज्योतिषी वेंकटेश बापूजी केतकर ज्योतिर्गणित, केतकी इत्यादि ग्रंथांचे कर्ते यांनीं 'बृहस्पतिः प्रथमं जायमानः । तिष्य नक्षत्रमभिसंबभूव ।' या तैत्तिरीय ब्राह्मणांतील वचनांत वर्णिलेल्या गुरुपुष्यांच्या निकट युतीचा म्हणा किंवा बृहस्पतिकृत पुष्य नक्षत्राच्या अधिक्रमणाचा म्हणा काळ इ. स. पूर्वी ४६५० वर्षे असा गणित करून ठरविल्यावर मृगशीर्ष कालाविषयींच्या लोकमान्यांच्या विवेचनाला स्वतंत्र प्रत्यंतर मिळालें; आणि अशा रीतीनें ओरायनमध्यें निर्दिष्ट केलेलें वैदिक वाङ्मयाचें प्राचीनत्व बहुतेक सर्वमान्य झालें.

पण मृगशीर्षकाळ झाला तरी तो कांहीं वैदिक सुधारणेचा आरंभकाल नव्हे. मृगकाळ म्हणजे वैदिकांच्या अत्यंत भरभराटीचा काळ. अर्थात् त्यांचा आरंभकाल त्याहून फार मागें असला पाहिजे हें उघड आहे. प्रो. ब्लूमफील्ड नामक पंडितानें ओरायनचें परीक्षण करतांना ही गोष्ट नमूद केलेली होती; व लोकमान्यांची तर त्या अनुमानावर मोठीच भिस्त होती. अर्थात् ह्या अनुमानाची सत्यता प्रस्थापित करणारीं प्रमाणें शोधून काढण्याची तळमळ त्यांना लागून राहिल्यामुळें तीं जमविण्याची खटपट त्यांनीं सुरू ठेवलेली होतीच. अशीं प्रमाणें जुळवीत असतां भूस्तरशास्त्र व पुराणवस्तुशास्त्र यांतील शोधांशीं त्यांचा परिचय होऊन, ओरायन लिहिते वेळीं ज्या कल्पना त्यांनीं तशाच सोडून दिल्या होत्या, त्या पुनः जोरानें डोकें वर काढूं लागल्या, व त्यांच्या शोधाला त्यामुळें निराळेंच वळण लागलें.

## आर्क्टिक होमच्या कल्पनेची परिणति

ध्रुवप्रदेशांत वसति होती असें अनुमान काढण्यांत पहिली अडचण म्हणजे नैसर्गिक परिस्थितीची. आज ध्रुवप्रदेशांची स्थिति पाहिली तर

ते सर्व समुद्रमय असून शिवाय अतिथंडीमुळें ते समुद्रहि बहुतांशीं गोठलेले असतात. जीवनाला अत्यंत अयोग्य अशी जर कोठें स्थिति असेल तर आज ती ध्रुवाजवळ आहे. असें असल्यामुळें केवळ ध्रुवविशिष्ट गोष्टींच्या ग्रंथोक्त उल्लेखांवरून ध्रुवप्रदेशांत वसति होती असें मानणें योग्य होणार नाहीं. पण आज आर्यवंशीय विविध लोक ज्या ज्या देशांत रहात आहेत तेथें तेथें ते कोठून तरी बाहेरून आलेले होत, तें कांहीं त्यांचें मूळ ठिकाण नव्हे, ही गोष्ट इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी, इराण, मध्य एशिया, हिंदुस्थान इत्यादि आर्यजातीय लोकांनीं वसलेल्या सर्व देशांना लागू आहे असें पुराणवस्तुशास्त्रानें निक्षून सिद्ध केल्यामुळें आर्य लोक मूळ आले कोठून या प्रश्नाचें उत्तर कांहीं तरी देणें अवश्य, पण तें देतां तर येत नाहीं अशी स्थिति उत्पन्न झाली. पण भूस्तर शास्त्रानें इतक्यांत असें सप्रमाण दाखवून दिलें कीं, इ. स. पूर्वी ८ ते १० हजार वर्षांच्या पूर्वी ध्रुवप्रदेश जलावेष्टित नसून तेथें मोठमोठीं वसतियोग्य अशीं भूखंडें होतीं व तेव्हां तेथील हवामानहि कडक थंडीचें नसून मनुष्यादि प्राण्यांच्या वसतीला सर्वथा अनुकूल असेंच होतें. अशा रीतीनें आर्यांच्या मूलस्थानाच्या प्रश्नाचा निकाल करण्यांत प्रथमदर्शनींच उत्पन्न झालेली अडचण भूस्तर शास्त्रानें दूर केल्यावर 'एकं वा एतद्देवानामहः यत्संवत्सरः' या वचनासारखीं ध्रुवप्रदेशाचीं लक्षणें सांगणारीं आणखी कांहीं वर्णनें वेदग्रंथांत सांपडतात कीं नाहीं हें पहाणें जरूर होतें. ध्रुवबिंदु व त्याच्या भोंवतींच्या २०–२२ अंशापर्यंतच्या प्रदेशांत आपल्याला अपरिचित अशीं पुष्कळ विविध लक्षणें आढळून येतात व त्या सर्वांचा उल्लेख जर त्या ग्रंथांतील व्यवहारवर्णनांत आढळला तर त्यांवरून ध्रुववसतीचें अनुमान करणें गैर होणार नाहीं. असा कोटीक्रम करून लोकमान्यांनीं आपलें काम सवडीनुसार चालविलें होतें. पण इतक्यांत १८९७ साल उजाडून पूर्वी सांगितल्याप्रमाणें कारागृहवासांत रहाण्याचा त्यांना प्रसंग आला. परंतु 'उदेति सविता रक्तो रक्त एवास्तमेति च। संपत्तौ च विपत्तौ च महतामेकरूपता' या न्यायानें त्याहि परिस्थितींत सांपडलेल्या संधीचा फायदा घेऊन लोकमान्यांनीं ध्रुववसतीचीं निदर्शक अशीं शेंकडों वैदिक

ग्रंथांतील प्रमाणें गोळा करून ठेविलीं, व प्रो. मॅक्स मुल्लर साहेबांच्या स्नेहमूलक खटाटीमुळें त्यांची मुदतीपूर्वीच सुटका झाल्यावर त्यांनीं आपल्या ध्रुववसतीच्या सिद्धांताला सुसंगत असें ग्रंथस्वरूपहि १८९८ सालीं देऊन ठेविलें. परंतु अजूनहि त्यांना कित्येक प्रश्नांचें समाधानकारक उत्तर देतां येणार नाहीं असें वाटल्यावरून त्यांनीं तो ग्रंथ प्रकाशित करण्याचें मनांत आणिलें नाहीं.

पण भूस्तरशास्त्रांतील अगदीं अलीकडे कळून आलेल्या गोष्टींवरून जेव्हां असें निष्पन्न झालेलें दिसून आलें कीं, इ. स. पूर्वी ८००० वर्षे उत्तर ध्रुवप्रदेश वसतियोग्य असून तेथील हवामान समधात होतें, व त्या सुमारास तेथें हिमप्रलय झाल्यामुळें तेथील वातावरण बिघडून मनुष्य प्राण्यांना वसति करण्यास अयोग्य झालें, तेव्हां हा शोध, वैदिक ग्रंथांत दिसून येणारीं ध्रुवप्रदेशलक्षण आणि वैदिक लोकांच्या सुधारणचें आदिमूळ इ. स. पूर्वी ४५०० वर्षापलीकडे बरेंच असलें पाहिजे अशा प्रकारचें वर नमूद केलेलें अनुमान यांशीं, अगदीं मिळता असाच झाला व त्यामुळें लोकमान्यांनीं आपला सिद्धांत लोकांपुढें मांडण्याचा निश्चय केला. हिंदुस्थानांतील जातिभेदाला शिव्या देऊन वेळीं अवेळीं त्यांच्या नावानें खडे फोडून हिंदुस्थानांतील कोंबडीं झुंजविणाऱ्या पाश्चात्य लोकांनाहि जातिभेदानें सोडलेलें नाहीं. वेदांचा व्यासंग करणारानें भूस्तरशास्त्रासंबंधानें अवाक्षर काढतां कामा नये, पदार्थविज्ञानाच्या अभ्यासूनें इन्द्रियविज्ञानांत फिरकूं नये असा त्या लोकांचा मोठा कटाक्ष असतो, आणि त्यामुळें प्रत्यक्ष पुराव्यानें किंवा समक्ष प्रयोगानें डोळयांदेखत दिसणाऱ्या गोष्टीहि असत्य होत असें मानण्यास हे पंडित पुढेंमागें पहात नाहींत. विद्वद्वर्य शास्त्रविच्चूडामणि जगप्रसिद्ध जगदीश चंद्र बसु यांना तर या पंडितांमधील जातिमत्सराचा चांगलाच अनुभव आला. वनस्पतींवर केलेल्या प्रत्यक्ष प्रयोगांनीं जी गोष्ट सिद्ध होते ती गोष्ट केवळ पदार्थविज्ञानशास्त्री इन्द्रियविज्ञानाच्या प्रदेशांत संचार करूं पहातो इतक्यावरून आंग्ल पंडितांनीं मान्य करावयाचें नाकारलें, आणि दहा वर्षेंपर्यंत त्यांच्या शोध-

विषयक लेखांना त्यांनीं आपल्यामार्फत तरी प्रकाश पाहूं दिला नाहीं, इतकेंच नव्हे अक्षरशः तसेच लेख दुसऱ्याच्या नांवावर प्रसिद्ध करण्यासहि त्यांनीं मागेंपुढें पाहिलें नाहीं. लोकमान्यांचें धैर्य अवास्तव म्हणणारांनीं या पुस्तकाच्या प्रकाशनाच्या ह्या इतिहासाचें थोडें मनन करण्यासारखें आहे. तात्पर्य एवढेंच कीं आपण कोणत्याहि शास्त्राच्या विषयांत बेहक पाऊल टाकतों असें होऊं नये म्हणून अंतस्थ खात्री बाजूला ठेवूनहि भूस्तरशास्त्री काय सांगतात तेंच पहाण्यासाठीं कांहींवेळ थांबून त्यांचा अनुकूल शोध उपलब्ध झाला तेव्हांच लोकमान्यांनीं आपलें पुस्तक प्रसिद्ध केलें.

## 'आर्क्टिक होम' चें स्वरूप

पुराणवस्तुशास्त्रानें आर्य लोकांचें मूलस्थान सांप्रतचें आर्य लोकांचें राहाण्याचें कोणतेंहि ठिकाण नव्हे" असें सिद्ध केलें, भूस्तरशास्त्रानें ध्रुवप्रदेश इ. स पूर्वी ८००० वर्षांमागें वसतियोग्य होते असें ठरविलें आणि वैदिक ग्रंथांमध्यें ध्रुवप्रदेशांतील लक्षणांचीं भरपूर वर्णनें दिसून येतात; या तीन गोष्टी एकत्र केल्या म्हणजे आर्य लोक हिमप्रलयापूर्वी ध्रुवप्रदेशांत रहात होते व त्यांची परंपरा अर्थात् अलीकडची नसून फार प्राचीन आहे असें अनुमान करावयास भरपूर प्रमाणें झालीं. पण इतक्यानेंहि कुणाचें समाधान न होण्यासारखें असल्यास त्याला पारशी धर्मग्रंथ जो अवेस्ता त्यांत प्रत्यक्ष पुरावा मिळतो असें लोकमान्यांनीं दाखविलें आहे. अवेस्त्यांतील स्पष्ट वचनांवरून असें दिसून येतें कीं. ऐर्यन वईजो म्हणजे आर्य लोकांचें बीजस्थान ज्या ठिकाणीं सूर्य वर्षांतून एकच वेळां उगवतो व एकच वेळां मावळतो अशा ठिकाणीं होतें व त्या ठिकाणाचा हिमप्रलयामुळें नाश झाल्यावर तो प्रदेश वसतीला सर्वथा अयोग्य झाला आणि म्हणून तेथील लोकांना दक्षिणेकडे वळावें लागतें. या अवेस्तिक वचनावरून भूस्तरशास्त्रानें अनुमित केलेल्या हिमप्रलयाला प्रत्यक्ष लेखी पुरावाच मिळाला व त्यामुळें आर्यांचें मूलस्थान इ. स ८००० पलीकडच्या काळीं उत्तर ध्रुवाजवळ होतें, असें निःसंशय सिद्ध होतें. अवे-

स्त्यांतील या वचनाचा शोध आज म्हणजे नव्यानें लागला असा भाग नाहीं. अवैस्तिक पंडितांपुढें तो प्रथमपासून आहेच, पण 'ध्रुवप्रदेश म्हटले म्हणजे प्रथमदर्शनींच भयंकर थंडीचे बर्फाच्छादित प्रदेश व ते सदा सर्वकाल तसेच अशी भावना उत्पन्न होत असल्यामुळें पुराणांतील अनेक असंभाव्य वाटणाऱ्या गोष्टींपैकींच ही एक असें विद्वानांनीं ठरविलें होतें. परंतु भूस्तरशास्त्रानें त्या कल्पनेचा पडदा दूर केल्यामुळें खरा प्रकार बाहेर पडला व त्याचे प्रथम द्रष्टे होण्याचा योग लोकमान्यांना मिळाला. हिंदुस्थानाला स्वराज्य दिल्यास येथें उत्पन्न होणाऱ्या काल्पनिक अनर्थांच्या चित्रामुळें जसे कांहीं सूज्ञ म्हणविणारे लोकहि भयाभीत होऊन जातात त्याप्रमाणें लोकमान्यांच्या सिद्धांतामुळें आजवर झालेली वेदकालशोधनांतील अनेक पंडितांची कामगिरी फुकट जाईल अशा भीतीनें कांहीं विद्वान ते सिद्धांत मान्य करावयास कचरतात. पण कोंबडा झाकल्यानें जसें उजाडावयाचें थांबत नाहीं, त्याप्रमाणें कित्येक अवास्तव भीतीनें व्याकुळ झालेल्या पंडितांच्या कचरण्याला न जुमानतां या सिद्धांतामुळें आजपर्यंतच्या विचारांत कसा काय फेरफार होईल व त्यामुळें आर्यांच्या प्राचीन सुधारणेसंबंधानें कसें मत बदलावें लागेल याचें मनोरम चित्र '**आर्क्टिक होम**' च्या शेवटच्या प्रकरणांत लोकमान्यांनीं काढिलें आहे.

'आर्क्टिक होम इन धि वेदाज' ऊर्फ वेदनिर्दिष्ट ध्रुवमंडलस्थ वसतिस्थान या ग्रंथांत लोकमान्यांनीं प्रतिपादिलेल्या सिद्धांताच्या उपपत्तीचा व प्रगतीचा असा हा संक्षिप्त इतिहास आहे; व तो लोकमान्यांनीं स्वतः त्या ग्रंथाच्या प्रस्तावनेंतच सांगितला आहे. आतां त्या सिद्धांताच्या उपपत्तीचें दिग्दर्शन करूं. आर्यांच्या मूलस्थानासंबंधानें प्रचलित असलेल्या कल्पनांचा व अलीकडे झालेल्या पुराणवस्तुशास्त्र, भूस्तरशास्त्र इत्यादि शास्त्रांतील नवीन शोधांचा मेळ बसत नसल्यामुळें त्या मूलस्थानाचा प्रश्न अनिर्णीतच रहातो, व त्याचा निर्णय करण्यास वेद आणि अवेस्ता यांवरून चांगलीं प्रमाणें उपलब्ध होतात. पण त्यांवरून दिसून येणारें ध्रुवमंडळस्थ वसतिस्थान सकृद्दर्शनीं असंभाव्य वाटत असल्यामुळें त्याची

संभवनीयताच नव्हे तर प्राचीन काळीं त्यांचें वास्तविक अस्तित्व सिद्ध करणें अवश्य आहे शिवाय भूस्तरशास्त्रावरून ध्रुवप्रदेशाचें वसतियोग्यत्व ज्या काळीं होतें असें ठरतें तो काळ, वेद व अवेस्ता यांवरून ऐतिहासिकदृष्ट्या निर्दिष्ट होणाऱ्या काळाशीं मिळता पाहिजे. तसा तो नसेल तर वडाची साल पिंपळाला चिकटविल्यासारखें होऊन त्यावरून कोणतेंच निश्चित अनुमान काढतां येणार नाहीं. म्हणून या दोन्ही गोष्टींचा सप्रमाण खुलासा लोकमान्यांनीं पहिल्या दोन प्रकरणांत केला आहे. वेदकालसंशोधनांत वैदिक लोकांच्या भरभराटीचा काल इ स. पूर्वी ४५०० वर्षें असा ठरला व त्याच्या मानानें त्याचें मूळ आणखी चार दोन हजार वर्षें असणें अगदीं शक्य आहे. म्हणजे इ. स १०,००० वर्षांपर्यंत वैदिक आर्यांचें मूळ नेता येईल. पण कांहीं ज्योतिशास्त्रज्ञांच्या मतें ध्रुवप्रदेश वसतियोग्य असण्याचा काळ ८०,००० वर्षांपूर्वीचा होय. पृथ्वीच्या पृष्ठावर होणाऱ्या ऋतुमानांच्या व त्यांत होणाऱ्या कमी अधिक तीव्रतेच्या कारणांचा विचार करतां त्यांत पृथ्वीच्या आंसाचा क्रांतिवृत्ताच्या आंसाशीं असलेला तिरकसपणा व पृथ्वीच्या आंसाची शंक्वाकार २१,००० वर्षांनीं पुरी होणारी प्रदक्षिणागति यांच्यामुळें तीं मुख्यतः होत असतात असें आढळून येतें; पण त्याच्या तीव्रतेंत न्यूनाधिक्य होण्याचें आणखीहि एक कारण आहे. पृथ्वीची कक्षा म्हणजे तिचा सूर्यभोंवतीं फिरण्याचा मार्ग हा दीर्घवर्तुळाकार असून तें दीर्घवर्तुलत्वाचें प्रमाण नित्य नाहीं, बदलणारें आहे. म्हणजे या दीर्घवर्तुळाच्या लहानमोठ्या व्यासांचें प्रमाण ( गुणोत्तर ) क्रमानें वाढत असतें व महत्तम झाल्यावर पुनः कमी होत जाऊन लघुतम होतें; असा त्याचा क्रम चाललेला असतो. त्यामुळें मोठ्या व्यासाचें मान महत्तम होतें तेव्हां त्याच्या सूर्यापासून दूर असलेल्या टोकाशीं पृथ्वी आल्यावर तीवर होणारा हिंवाळा इतर ठिकाणीं होणाऱ्या हिंवाळ्यापेक्षां फार कडक असतो. असे हिंवाळे कांहीं काळ लागोपाठ झाले म्हणजे त्यांपासून हिमप्रलय होतो व अर्थात् ते पृथ्वीचे भाग मनुष्यवसतिला निरुपयोगी होतात. आतां असा प्रकार केव्हा केव्हां होऊं शकतो, व शेवटचा हिमप्रलय केव्हां होऊन गेला

याविषयीं कांहीं ज्योतिर्विद व भूस्तरशास्त्रज्ञ यांत फारच मोठा मतभेद आहे. परंतु अलीकडील शोधांवरून तो मतभेद नाहींसा होऊन ज्योतिः-शास्त्रदृष्ट्या गेल्या हिमप्रलयाचा काल व भूस्तर शास्त्रांवरून दिसून येणारा त्याचा काळ यांत बहुतेक एकवाक्यता झाली आहे असें म्हणावयास हरकत नाहीं. या संयुक्त मताप्रमाणें पहातां गेला हिमकाल संपून हिमोत्तर काल सुरू झाल्याला सुमारें १०,००० वर्षे होऊन गेलीं. त्या हिमकालापूर्वी उत्तर ध्रुवप्रदेशांतील हवामानाचा प्रकार म्हणजे गार उन्हाळे व गरम हिवाळे असा होता. अशा रीतीनें एक प्रकारचा अखंड वसंतच तेथें त्या युगांत नांदत असल्यामुळें आज केवळ समशीतोष्ण किंवा उष्ण कटिबंधांत आढळत असलेले वृक्ष, वनस्पति व प्राणी यांचें तत्कालीन उत्तर ध्रुवप्रदेश म्हणजे आगरच होतें. हिमप्रलयामुळें पुढें हें हवामान अगदींच पालटलें व उपरिनिर्दिष्ट प्राणि व वनस्पति यांच्या वसतीला तें अगदीं अपात्र झालें.

अशा रीतीनें भौतिक शास्त्रांवरून सकृद्दर्शनीं दिसणारे उत्तरध्रुववसतिविषयक आक्षेप त्या शास्त्रांतीलच नूतन शोधांवरून दूर झाल्यामुळें सर्व मानव जातींचें मूळस्थान उत्तर ध्रुवप्रदेशच असलें पाहिजे असें पुष्कळ शास्त्रज्ञ व पंडित यांस वाटावयास लागलें. शास्त्रज्ञांच्या या अनुमानाला वैदिक ग्रंथावरून आर्य जातीच्या लोकांपुरता तरी सबळ आधार मिळतो व पारशी धर्मग्रंथ जो झेन्द अवेस्ता त्यांत तर त्याविषयीं प्रत्यक्षच प्रमाण मिळतें हें दाखविण्याचें काम लोकमान्यांनीं केलें आहे

झेन्द अवेस्त्यांत असें स्पष्टच म्हटलें आहे कीं, आर्यांचें मूलस्थान जेथें वर्षांतून एक दिवसरात्र असते अशा ठिकाणीं म्हणजे ध्रुवाजवळ होतें; व तो प्रदेश हिमप्रलयामुळें वसतीला अयोग्य झाल्यामुळें तेथील लोक हळुहळु दक्षिणेकडे उतरत आले. परंतु वैदिक ग्रंथांमध्यें असे स्पष्ट उल्लेख नाहींत. ध्रुवमंडळस्थ प्रदेश म्हणजे ध्रुवबिंदूपासून सुमारें २३॥ अक्षांशापर्यंतचे प्रदेश आणि तदितर पृथ्वीचा भाग यांत खगोलाचें भ्रमण, दिवसरात्रीचें प्रमाण इत्यादि गोष्टींत फारच भिन्नत्व आहे. या ध्रुवविशिष्ट

चमत्कारांचें साग्र व सोपपत्तिक वर्णन लोकमान्यांनीं आपल्या पुस्तकाच्या तिसऱ्या प्रकरणांत फार चटकदार रीतीनें केलें आहे. या ध्रुवमंडळस्थ प्रदेशांतील चमत्कारांचेहि पुनः दोन प्रकार होतात. एक खुद्द ध्रुवाजवळ दिसणारे चमत्कार व दुसरे ध्रुवापासून २३॥ अक्षांशापर्यंतच्या प्रदेशांतील चमत्कार. यांतील पहिल्या प्रकारचे मुख्य चमत्कार म्हटले म्हणजे खुद्द ध्रुवावर सबंद वर्षांत एक दिवस व एक रात्र, एक सकाळ, एक संध्याकाळ, एक उषा व एकच सध्या आणि सूर्य चंद्र आणि तेच तेच तारे यांचें प्रेक्षकाभोंवतीं प्रदक्षिण फिरणें हे होत. दुसऱ्या प्रकारांत एक चोवीस तासांपेक्षां अधिक अवधीचा दिवस व तेवढीच रात्र आणि इतर उरलेल्या वर्षाच्या अवधींत २४ तासांचीं अहोरात्रें, त्याचप्रमाणें एक दीर्घावधि उषा व तेवढीच एक संध्या आणि अहोरात्रांच्या जोडीला त्यांच्या बेताच्या उषा व संध्या या येतात. या चमत्कारांचा उल्लेख जर वैदिक ग्रंथांत प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष रीतीनें केलेला असेल व त्यांचा संबंध जर लोकांच्या रोजच्या नित्य नैमित्तिक व्यवहाराशीं येण्यासारखा असेल तर तसा उल्लेख करणारे वैदिक ऋषि समशीतोष्ण किंवा उष्णकटिबंधांत रहात असणें शक्यच नाहीं. लोकमान्यांनीं या वैदिक पुराव्याचे दोन भाग करून एकांत या चमत्कारांच्या प्रत्यक्ष उल्लेखांचें विवेचन केलें आहे व दुसऱ्यांत अनेक वैदिक कथांवरून या प्रत्यक्ष उल्लेखांना कशी पुष्टि मिळते तें दाखविलें आहे.

ध्रुवविशिष्ट व ध्रुवमंडलविशिष्ट चमत्कारांच्या प्रत्यक्ष उल्लेखांत दीर्घ रात्र आणि दीर्घ उषा, २४ तासांहून अधिक अवधीचा दिवस व तसलीच रात्र, त्यांना अनुसरून बारांहून कमी महिने व त्याअन्वयें सहाहून कमी ऋतु, यांचा समावेश होतो, व त्यांचाच लोकमान्यांनीं प्रथम विचार केला आहे. संवत्सर म्हणजे देवांचा एक दिवस असें तैत्तिरीय ब्राह्मणांतलें वचन पूर्वीं सांगितलेंच आहे. वैदिक ग्रंथापासून तो अगदीं अलीकडच्या ज्योतिषग्रंथांपर्यंत उत्तर ध्रुवाला अगदीं बरोबर लागू पडणारें असें वर्णन आलें असून तें मेरु पर्वताचें म्हणून त्यांत दिलेलें

आहे, व हा मेरु म्हणजे देवांचें वसतिस्थान असें पुराणग्रंथांत व ज्योतिष ग्रंथांत म्हटलें आहे. हें वर्णन केवळ काल्पनिक किंवा गणितशास्त्रावरून केलें असेल हें शक्य नाहीं. या ठिकाणीं लोकमान्यांनीं एक मजेचा पेंच टाकला आहे. वेदकालसंशोधनाच्या ज्योतिषपद्धतींत वैदिक ऋषींना संपात, अयनें, क्रांतिवृत्त इत्यादिकांचें चांगलें ज्ञान असलें पाहिजे असें मानावें लागतें; पण असें मानावयास पाश्चात्य पंडित मोठे नाखुष होते. सृष्टींतील शक्तींकडे विस्मयपूर्ण दृष्टीनें पाहून कांहीं भीतीनें तर कांहीं आदरानें त्यांच्या स्तुतिपर उद्गार काढणारे वैदिक ऋषी ज्योतिषशास्त्रांत तज्ज्ञ तर नव्हेतच पण त्यांतील स्थूल गोष्टी जाणणारे सुद्धां कधे असतील अशी शंका घेणारे हे पंडित आतां जर असें म्हणूं लागले कीं, अहो या श्रुतिस्मृति पुराण ज्योतिष इत्यादि ग्रंथांत उत्तरध्रुवाचें जें वर्णन आहे तें प्रत्यक्ष पहाणारानें केलेलें नसून ज्योतिषांनीं सूक्ष्म अनुमानानें बसविलें, तर त्यांना एवढेंच विचारावयाचें कीं, ज्यांना क्रांतिवृत्त, अयनें, इत्यादि गोष्टी समजत नव्हत्या त्या अर्धवट रानटी ऋषींनीं इतक्या सूक्ष्म गोष्टी ज्योतिषावरून अनुमानानें ठरविल्या असाव्या हें म्हणणें जुळतें ना? तात्पर्य या ध्रुवप्रदेशाच्या वर्णनाला मूळ प्रत्यक्ष दर्शनाचाच आधार असून पुढें मात्र परंपरेनें तें पुढील ग्रंथांत येत गेलें असेंच म्हणावें लागतें. झेन्द अवेस्त्यांत ऐर्यन वईजो म्हणजे आर्य लोकांच्या बीजस्थानांत 'सबंध वर्ष एका दिवसासारखें असतें व तेथें सूर्य, चंद्र व तारे वर्षांतून एकदांच उगवतात व एकदांच मावळतात' असें स्पष्ट वचन असल्यामुळें या एकाच वाक्यावरून ध्रुवोपपत्ति सिद्ध होते याशिवाय दीर्घ रात्रींतून केव्हां एकदां मुक्त होऊन जातों अशी उत्कंठा दर्शविणारीं वैदिक वचनेंहि अनेक आहेत आणि त्यांचाहि संबंध ध्रुवप्रदेशांतील दीर्घकालीन रात्रीं-शींच असला पाहिजे.

•

रात्र ज्या मानानें दीर्घ असेल त्या मानानें उषःकालाचा व संध्याकालाचा अवधि देखील दीर्घ होत असतो हें सांगावयास नकोच. वैदिक ग्रंथांत जर ध्रुवाजवळील मूलस्थानाचा संबंध असेल तर त्यांतील उषः-

कालाच्या वर्णनांतहि आपल्या इकडील अवधीपेक्षां दीर्घ अवधीचीं चिन्हें स्पष्ट पाहिजेत, व तशीं तीं आहेत हें वैदिक उषा या प्रकरणांत लोकमान्यांनीं दाखवून दिलें आहे. उषेचा उदय झाल्यापासून सूर्य उदय होईपर्यंत अश्विनं शस्त्र नांवाचें एक हजार सूक्तांचें स्तोत्र ‘ गवां अयन ’ सत्राचे आरंभीं म्हणावें व तें म्हणून झाल्यावरहि सूर्य न उगवला तर सगळीं दहाहि ऋग्वेदाचीं मंडळें म्हणावीं असें सूत्र-ग्रंथांत सांगितलें आहे. तसेंच उषा देवीची ‘ तूं फार वेळ थांबूं नको ’ अशी विनवणी व ‘ पूर्वी उषा फार वेळ रहात असे ’ अशा प्रकारचेहि उल्लेख वैदिक ग्रंथांत आढळतात. याशिवाय उषेचा अवधि तीस दिवसांइतका होता अशा-विषयींहि स्पष्ट वचनें त्यांत आहेत; व ऋग्वेदांत प्रेक्षकाभोंवतीं होणाऱ्या तिच्या प्रदक्षिणेचाहि उल्लेख आहे. या उल्लेखांवरून या उषेचें ध्रुव-विशिष्टत्व स्पष्ट होतें, असा लोकमान्यांनीं सिद्धांत काढिला आहे.

सहा महिन्यांहून लहान पण चोवीस तासांहून मोठी अशी रात्र ध्रुवा-पासून थोड्या अंतरावरील प्रदेशांत असते व तसाच एक दिवसहि तेथें असतो. याशिवाय आपल्या इकडील प्रमाणें चोवीस तासांचीं अहो-रात्रेंहि कांहीं त्या ठिकाणीं होतात व याहि सर्व गोष्टींचा उल्लेख वैदिक ग्रंथांत आढळतो. अहोरात्रांच्या जोडीचे दोन प्रकार ऋग्वेदांत सांगितले आहेत. त्यांत एकाला ‘ उषासानक्ता ’ असें नांव दिलें असून दुसऱ्याला ‘ अहनी ’ असें म्हटलें आहे. त्यांत उषासानक्ता म्हणजे साधीं अहोरात्रें व अहनी म्हणजे ध्रुवबिन्दूबाहेरील ध्रुवप्रदेशांतील दीर्घ दिवसरात्रींची जोडी होय असें सिद्ध केलें आहे, व सूर्य आपला रथ भर आकाशांत कांहीं काळ सोडून ठेवितो अशा अर्थाचें जें वर्णन आहे त्याचा संबंध दीर्घावधि दिवसाशीं असला पाहिजे, असें दाखविलें आहे. ध्रुवमंडळांतर्गत प्रदेशांतील संवत्सरव्यवस्थेंत ऋतूंची न्यूनाधिक संख्या हा एक विशिष्ट प्रकार आहे, आणि अदितीच्या सात आदित्यरूप पुत्रांची व आठवा मृत म्हणून टाकून दिलेल्या पुत्राची कथा पहातां, व ‘ दशग्व ’ व ‘नवग्व’ म्हणजे दहा महिन्याचें व नऊ महिन्याचें संवत्सरसत्र

मानणाऱ्या यजमानांच्या नांवाचा विचार करितां त्यावरून सात, नऊ किंवा दहा महिन्यांच्या वर्षाचा बोध होतो व असें वर्ष केवळ ध्रुवप्रदेशांतच आढळून येणारें आहे. असल्या वर्षाचे उल्लेख सर्व ठिकाणच्या आर्य कथांत असल्यामुळें हे सर्व मूळ आर्यस्थानांत रहात होते तेव्हांपासून त्यांच्यांत ही गोष्ट माहीत आहे व तें मूळ आर्यस्थान म्हणजे ध्रुवप्रदेश होत असें ओघानेंच म्हणावें लागतें या कथांत दहाव्या महिन्यांत सूर्य वृद्ध होऊन क्षितिजाखालीं जातो असा जो एक प्रकार आढळतो त्यावरून या गोष्टीच्या ध्रुवस्थानीयत्वाबद्दल संशयच रहात नाहीं.

या अनुमानाला 'गवां अयनम्' नांवाच्या संवत्सरसत्राच्या वर्णनावरून आणखी बळकटी येते. हें सत्र नऊ, दहा किंवा बारा महिने असें चालत असून प्रत्येकाला फळ सारखेंच मिळतें असें म्हटलें आहे, यावरून नऊ किंवा दहा महिन्यांचें वर्षच या परंपरेनें उद्दिष्ट असलें पाहिजे. येथपर्यंत ध्रुववसतिस्थानाविषयीं प्रत्यक्ष म्हणतां येतील अशा प्रमाणांचें लोकमान्यांनीं जें निरूपण केलें आहे त्याचें स्वरूपकथन झालें. याविषयींच्या अप्रत्यक्ष पुराव्यांत त्यांनीं इन्द्र, अश्विन, उषा, बृहस्पति इत्यादिकांच्या कथांचें सविस्तर उद्‌घाटन करून या देवता म्हणजे प्रकाशदेवता होत, व त्यांनीं पराजित केलेले नमुचिशंबरादिक शत्रु म्हणजे दीर्घ अंधकार होय, अश्विनांनीं ज्या रोग्यांना बरें केलें तीं सर्व दीर्घ रात्रींत सांपडलेल्या सूर्याचीच रूपें होत, इन्द्राच्या शतक्रतु या अभिधानाचा संबंध शतदिनावधि अखंड काळोखाच्या काळांत त्याला त्या अंधकाराशीं झगडण्यासाठीं उत्तेजन यावें म्हणून मुद्दाम केलेल्या यज्ञाशीं आहे, श्रुति स्मृति व पुराणें यांत सात, नऊ, दहा इत्यादि संख्यांकित अनेक गोष्टींचा संबंध ध्रुववसतिस्थानाशींच लावावा लागतो, असें सांगून व दुसऱ्या वैदिक देवताविषयक कथा आपल्या उपपत्तीच्या अनुरोधानें त्यांनीं सविस्तर, सप्रमाण व मनोरंजक रीतीनें स्पष्ट करून दिल्या आहेत; आणि शेवटीं या सर्व प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष प्रमाणांचें झेन्दावेस्ता, पेल्हवी वगैरे पारशी धर्मग्रंथ, तसेंच यूरोपियन आर्यवंशीय लोकांच्या पुराणकथा यांशीं असलेलें निकट

साम्य दाखविलें आहे. त्याच्या स्वरूपाचा विचार येथें स्थलसंकोचास्तव करीत नाहीं.

याप्रमाणें वेद आणि अवेस्ता यांतील स्पष्ट वचनांवरून वैदिक ऋषींना केवळ ध्रुवप्रदेशांतच आढळून येणाऱ्या सृष्ट चमत्कारांची चांगली ओळख होती; तसेंच क्षितिजावर चक्राकार प्रदक्षिणा करीत फिरणारी उषा, वृत्रानें अडविलेलीं उदकें, अश्विनांनीं रोगमुक्त केलेले सूर्य आणि इतर देव, शतक्रतु अभिधान पावलेला इन्द्र, तीन पावलांनीं विश्वानें आक्रमण करणारा विष्णु, रात्रि आणि समुद्र यांची देवता वरुण, सात मासदेवता रूप सात आदित्य इत्यादि प्रमुख वैदिक देवांचें स्वरूप पाहिल्यास त्यांवरून ध्रुवप्रदेशांतील परिस्थितीचाच बोध होतो असें लोकमान्यांनीं दाखविलें आहे. या विवेचनांत त्यांनीं शेंकडों श्रुतिवचनांचा ऊहापोह केला असून त्यांत ऋग्वेदांतील निदान शंभर ऋचांचा अर्थ अधिक सयुक्तिक तऱ्हेनें आपल्या उपपत्तीवर बसविला आहे. यांपैकीं कांहीं ऋचा तर आजपर्यंतच्या भाष्य-भाषान्तरकारांना अगदीं गूढ वाटत होत्या. त्यांचा अर्थ लोकमान्यांनीं या ध्रुवसिद्धान्तानुसार अगदीं सरळ रीतीनें लाविलेला असल्यामुळें त्यांनीं आपल्या ग्रंथाच्या नांवाला Being also a new key to the interpretation of many Vedic texts and legends म्हणजे 'अनेक वैदिक ऋचा व कथा यांचें स्पष्टीकरण करण्याचें नवीन साधन' अशा आशयाची जी पुरवणी जोडिली आहे तिची सार्थकता प्रत्ययाला येते. याशिवाय या विवेचनांत यूरोपीय पुराणकथा आणि हिंदी पुराणकथा यांतील साम्य पाहून अहंमन्य पाश्चात्य पंडितांनीं या कथा हिंदी कवींनीं यूरोपीय पुराणांतून उसन्या घेतल्या किंवा चोरल्या असें म्हणण्याची जी अवास्तव घाई केली होती, तिलाहि सौम्य पण निरुत्तर कोटिक्रमयुक्त असें शास्त्रीय उत्तर दिलेलें आहे. तें पाहिल्यावर रामायण होमरपासून चोरिलें इत्यादि बाष्कळ आरोपांचें खंडन करण्याची देखील गरज रहात नाहीं. कारण सर्व आर्य लोकांचें मूळ एकाच ठिकाणीं म्हणजे उत्तर ध्रुवप्रदेशांत होतें असें सिद्ध केल्यावर त्यांच्या निरनिराळ्या शाखांतून अनेक

गोष्टींत साम्य आढळावें हें स्वाभाविकच आहे. या विवेचनावरून या निबंधाच्या आरंभीं लोकमान्यांच्या वेदविषयक कामगिरींत देखील त्यांच्या मुख्य ध्येयाचें स्वरूप डोळ्यांपुढून हालत नाहीं असें जें म्हटलें आहे तें यथार्थ होय असें स्पष्ट दिसून येतें.

याप्रमाणें आपला सिद्धान्त सप्रमाण स्थापित केल्यावर लोकमान्यांनीं शेवटच्या प्रकरणांत या सिद्धान्तान्वयें आजपर्यंतच्या कल्पनांत कसा काय फरक करावा लागेल, त्याचा आमच्या परंपरागत गोष्टींशीं कितपत मेळ पडतो इत्यादि विषयांचें विवेचन केलें आहे. ध्रुवाजवळ आर्यांची वसति होती असें त्यांच्या ग्रंथांतील वचनांवरून अनुमान झालें, व त्याला भूस्तरादि भौतिक शास्त्रांचाहि आधार मिळाला. पण भूस्तर शास्त्रज्ञांत ध्रुववसतीच्या काळाविषयीं मतभेद आहे. आग्रयण ऊर्फ वेदकाल-संशोधन या पुस्तकांत वेदांचा काल इ. सनापूर्वी ६००० वर्षें म्हणजे पुनर्वसूंत वसंतसंपात होता त्या काळापलीकडे नेमण्याला प्रमाण सांपडत नाहीं हें दाखविलेंच आहे. या वेळीं ज्या देवतांचीं स्तोत्रें ऋषींनीं गाइलीं त्या देवता पूर्वयुगीन होत्या अशीं वचनें वेदांत आढळतात. प्राचीन काळच्या गोष्टींचें हें स्मरण ६००० वर्षांपलीकडे आणखी तीन चार हजार वर्षें नेतां येणें शक्य आहे. वेदशास्त्र पुराणें इत्यादि ग्रंथांत व आर्यजातीय इतर लोकांच्या पुराणांतहि पृथ्वीवरील सांप्रतची मनुष्यसुधारणा प्रलयोत्तरकालीन आहे अशी कल्पना स्पष्ट आढळून येते. या सर्व गोष्टींचा मेळ घालावयाचा तर आर्य लोक उत्तर ध्रुवावर शेवटच्या प्रलयापूर्वी रहात होते, व त्या काळाची शेवटची मर्यादा इ. सनापूर्वी ८००० किंवा १०००० वर्षांच्या पलीकडे नसावी असें अनुमान होतें. पण हा शेवटचा हिमप्रलय होऊन गेल्याला कांहीं भूस्तरशास्त्र्यांच्या मतें २०,००० व कांहींच्या मतें तर ८०,००० वर्षें होऊन गेलीं. पण अमेरिकन भूस्तरविद्याविशारदांनीं अनेक गोष्टींच्या सूक्ष्म निरीक्षणानें हा काळ इ. सनापूर्वी ८००० वर्षें असाच ठरविला आहे, व त्याचा पडताळा आर्य लोकांच्या धर्मग्रंथांवरून मिळत असल्यामुळें तोच खरा धरिला पाहिजे असें लोकमान्यांनीं दाखविलें आहे.

ज्या वैदिक ग्रंथांवरून हा सिद्धांत प्रत्ययाला येतो ते ग्रंथ प्रमाण कशावरून असा प्रश्न कोणी करील तर त्याला लोकमान्यांचें उत्तर असें आहे कीं, दशांगांनीं युक्त असे वेदग्रंथ आज तीनचार हजार वर्षें अगदीं स्वरशः व अक्षरशः जसेच्या तसेच वेदपाठकांनीं कायम ठेविले आहेत ही गोष्ट आतां सर्वांनाच मान्य आहे. तर इतका काळ इतक्या काळजीनें ज्या वैदिकांनीं वेदांचें रक्षण केलें त्याच्याच वाडवडील ऋषींनीं त्यांच्यापूर्वी आपल्या सुधारणेचा वृत्तान्त परंपरागत राखिला यांत अविश्वसनीय तें काय? उत्तम कमावलेली स्मरणशक्ति काय काय करूं शकते याची मुद्रणकलेच्या या युगांत कोणाला चांगली कल्पना होणार नाहीं; पण प्राचीन काळीं छापी पुस्तकें नव्हतीं तेव्हां स्मरणशक्तीची विलक्षण वाढ ही हरघडी लागणारी केवळ आवश्यक अशी गोष्ट होती. अर्थविहीन वेदपठण करणाऱ्या वैदिकांची यास्कासारख्या आचार्यांनीं देखील 'भारवाहक' या शब्दानें निंदा केली आहे, पण आज वैदिक ग्रंथाचा जो अभ्यास होऊन मनुष्याच्या प्राचीन इतिहासाचा उलगडा होत आहे, त्याचें सर्व श्रेय या वैदिक पाठकांना आहे यांत कांहीं शंका नाहीं. आर्यवंशीय इतर लोकांच्या दंतकथांशीं वैदिक व अवैस्तिक कथांचें जें निकट साम्य आहे, त्यावरूनहि वेदांच प्रामाण्य सिद्ध होतें.

याप्रमाणें वैदिक सुधारणा केवळ प्रलयोत्तरकालीन नसून ती प्रलयपूर्वकालीन होय असें ठरलें. प्रलयामध्यें त्या सुधारणेचा बराच अंश नष्ट झाला असला पाहिजे हें उघड आहे. अर्थात् केवळ ग्रंथावरून आर्यांच्या या आदिसुधारणेचें जें स्वरूप पाश्चात्य पंडितांनीं रेखाटण्याचा प्रयत्न केला आहे, तें तिचें किमानरूप होय, वास्तविक व संपूर्ण नव्हे, तें पूर्ण स्वरूप कसें होतें हें आज सांगतां येणार नाहीं. प्रलयपूर्वकालीन अज्ञात युगांत तें गडप झालेलें आहे. वेद अनादि आहेत, 'धाता यथा पूर्वमकल्पयत्' इत्यादि ज्या कल्पना वेदांसंबंधानें परंपरागत रूढ आहेत त्यांचा अर्थ आतां स्पष्ट होतो. वेद म्हणजेच 'वैदिक सुधारणा' प्रलयांत नष्ट होऊन पुढें पुनः सृष्टिरचना होऊन त्यांचा प्रादुर्भाव होतो

असें पतंजलि, व्यास इत्यादिकांचें जें म्हणणें आहे तेंहि आतां स्पष्ट कळूं लागतें. ऐतरेय ब्राह्मणांत सांगितलेलीं कृतादि चार युगांची संचारादि लक्षणें सांगितलीं आहेत त्यांचा उलगडाहि आतां ध्रुवस्थानांतून निघून हिंदुस्थानांत येऊन स्थिर होईपर्यंतच्या आर्य लोकांच्या चार पायऱ्यांवरून करतां येतो. पहिलें कृतयुग म्हणजे नवीन जागा पहातं फिरण्याचें, दुसरें त्रेतायुग म्हणजे कोठें तरी पाय रोंवण्याचा प्रयत्न करण्याचें, तिसरें द्वापार म्हणजे एक स्थान नापसंत ठरल्यास तें टाकून पुनः दुसरीकडे जाण्याचा प्रयत्न करण्याचें व शेवटचें कलि म्हणजे मनाजोगतें स्थान मिळाल्यावर तेथें स्थिरस्थावर होऊन एकमेकांशीं भांडूं लागण्याचें युग असा अर्थ करतां येतो.

वैदिक सुधारणा प्रलयपूर्वकालीन आहे असें म्हणावयास आणखीहि वैदिक प्रमाणें आहेत. वेदांचीं अक्षरें बदललीं तरी अर्थ बदलत नाहीं, वैदिक देवता व त्यांचे पराक्रम पूर्व युगांतील होत, अशा अर्थाचीं जीं जीं वचनें आहेत त्यांवरून वैदिक सुधारणेचें मूळ प्रलयपूर्वकालीनत्व आणि सांप्रतच्या तिच्या स्वरुपाचें प्रलयोत्तरकालीनत्व यांचीच सिद्धि होते.

## वैदिक कालाच्या मर्यादा

या सर्व गोष्टींचा विचार करतां प्रलयोत्तरकालीन युगापासून तों बुद्धापर्यंतच्या काळाचे चार स्थूल भाग करतां येतात. इ. स. पूर्वी १०,००० पासून ८,००० वर्षांपर्यंतचा काळ हा ध्रुवप्रदेशांत शेवटचा हिमप्रलय झाल्यामुळें आर्य लोक तेथून निघून जाण्याचा काळ होय. यापुढें इ. स. पूर्वी ५,००० वर्षांपर्यंत आर्य लोक मनाजोगतें ठिकाण पहात भटकत होते. या भटकण्याच्या काळांत त्यांच्या सुधारणेची व धर्माची बरीच वाताहात झाली. पण या काळाच्या शेवटीं म्हणजे वसंत संपात पुनर्वसूंत आला त्या वेळेच्या सुमारास आर्यांनीं आपल्या उच्छिन्न झालेल्या धर्माची व सुधारणेची पुनः घडी बसविण्याचा यत्न केला. नंतर २००० वर्षेंपर्यंतच्या काळांत म्हणजे मृगशीर्षांत वसंतसंपात होतां तेव्हां हा जम चांगला जमून वैदिक सूक्तांची व यज्ञप्रक्रियेची रचना

झाली. यापुढील हजार दीड हजार वर्षांत सूक्तांच्या संहिता बनून त्यांवर टीकारूप ब्राह्मण ग्रंथ तयार झालेल्या काळाच्या अखेरीस वेदांगज्योतिषाची मूळ रचना झाली. इ. स. पूर्व १४०० पासून ५०० पर्यंतचा काळ हा या काळापैकीं शेवटचा काळ असून त्यांत सूत्रग्रंथ व षड्दर्शनादि तत्त्वशास्त्रें यांचा प्रादुर्भाव झाला. या काळाला बुद्धपूर्वकाल ह्मणतात.

याप्रमाणें ध्रुवमंडळस्थ आर्य लोकांचें वसतिस्थान व त्याच्या अनुरोधानें आर्यांच्या सुधारणेचें स्वरूप याविषयींच्या लोकमान्यांच्या सिध्दान्ताचें सार आहे. त्यांच्या या दुसऱ्या पुस्तकाच्या शेटवच्या वाक्यांत जो विचार ग्रथित केला आहे त्यावरून त्यांचें ध्येय सर्व कार्यांत एकच कसें होतें हें समजून येईल. त्यांच्या म्हणण्याचें सार एवढेंच आहे कीं, 'आर्यांच्या धर्मग्रंथांतील वचनांचा अगदीं नवीन अशा भौतिक शास्त्रविषयक शोधांशीं मेळ घालण्यांत आम्हीं कोणतेंहि धाडस करीत नसून एकंदर चालू काळाच्या धोरणाचेंच अवलंबन करीत आहों.' असो.

## खाल्डियन वेद

आतां लोकमान्यांच्या वेदविषयक तिसऱ्या लेखाकडे वळूं. या लेखाचें नांव खाल्डियन व भारतीय वेद असें आहे. गेल्या शतकाच्या मध्याच्या सुमारास मेसोपोटेमियामध्यें सांपडलेल्या प्राचीन खाल्डियन लोकांनीं केलेल्या इष्टकालेखांत त्यांचा धर्म व सुधारणा याचा वृत्तान्त असल्यामुळें ऋग्वेदादि ग्रंथाप्रमाणें त्या लेखांना वेद हीच संज्ञा एका पश्चात्य पंडितानें दिली आहे. या लेखांत व वेदांत ग्रथित केलेल्या अनेक गोष्टींत साम्य आहे व त्यावरून कोणी तरी कोणाची उसनवारी केली असलीच पाहिजे असें पाश्चात्य पंडितांनीं ठरवून हें उसनवारीचें कृत्य बिचाऱ्या हिंदी वेदांच्या माथीं मारण्याचा प्रयत्न केला. त्याला उत्तर म्हणून हा लेख लोकमान्यांनीं लिहिला आहे. त्यांच्या पूर्वीच्या दोन ग्रथांत वेदकाल व वैदिक सुधारणेचा काल यांविषयीं जे सिद्धान्त स्थापित केले आहेत त्यांचा विचार करतां या खाल्डियन लोकांची सुधारणा जशी इ. सनापूर्वी ५००० वर्षांइतकी जुनी आहे

तशीच वैदिक सुधारणाहि जुनीच आहे हें उघड झालें आहे. या निबंधांत लोकमान्यांनीं असें दाखविलें आहे कीं, खाल्डियन व भारतीय लोकांचें साम्य केवळ उसनवारीमुळें उत्पन्न झालें नसून दोहोंचें मूळ ध्रुववसति-स्थानांत असल्यामुळें झालेलें आहे. या दोन्ही सुधारणा समकालीन असून इ. सनापूर्वी ५००० वर्षांच्या सुमारास दोघांचा परस्परव्यवहार होत होता व त्यामुळें दोन्ही लोकांनीं एकमेकांपासून घेण्याजोग्या गोष्टी घेतल्या आहेत. वैदिक देवतांचीं मित्र, वरुण, इंद्र, नासत्य हीं नांवें खाल्डियन लेखांत सांपडतात, तर खाल्डियनमधील जादूटोणा व मंत्रतंत्र इत्यादि विषयांतील तिआमत, आलिगी, विलगी, तावुव, ऊरुगूल इत्यादि नांवें अथर्व वेदांत दिसून येतात. तसेंच यव्ह, अप्सु, उरु इत्यादि वैदिक शब्द तिकडे यव्हे ऊर्फ जेहोवा, अब्झु, व उरु या रूपांनीं आढळतात, तर सिनीवाली, तुर्फरीतू इत्यादि खाल्डियन शब्द वेदांत येतात. याशिवाय सृष्ट्युत्पत्ति व विश्वरचना यांसंबंधीं कथा व कल्पना यांमध्येंहि या लोकांच्या लेखांत निकट साम्य आहे. ध्रुवस्थानीय आर्य लोकांच्या वसतिसंबंधानें देखील खाल्डियन लेखांत प्रमाणें आहेत असें लोकमान्यांनीं दाखविलें आहे. या विवेचनांत खाल्डियन लेखांमुळें कित्येक वैदिक शब्दांच्या अर्थावर नवीन प्रकाश कसा पडतो व आजवर क्लिष्ट म्हणून मानिलेल्या कांहीं वैदिक वचनांचा सरळ अर्थ कसा लागतो यांचेंहि लोकमान्यांनीं दिग्दर्शन केलें आहे त्यांत अप्सु व उरु म्हणजे पाताळांतील प्रदेश हा खाल्डियन वाङ्मयांतील अर्थ वैदिक शब्दांना फारच समर्पक रीतीनें त्यांनीं लाविला आहे. याप्रमाणें विवेचन करून शेवटीं त्यांनीं असें म्हटलें आहे कीं, दोन प्रकारच्या सुधारलेल्या लोकांचें संघटन झालें व त्यांचें मूळ प्रथम एकच असलें तर त्यांच्यांत कल्पनासाम्य आढळल्यास त्यांत नवल तें काय ? व असें आढळत असल्यास अमक्यानें तमक्याची केवळ उसनवारी केली असें म्हणण्यांत तरी काय पुरुषार्थ ?

लोकमान्यांच्या वेदविषयक तीन लेखांचें असें हें स्वरूप आहे. आपल्या देशांतील अलीकडील विद्यापीठें बाल्यावस्थेंत व तदानुषंगिक पराधीनतेंत

असल्यामुळें कोणी एकादी नवीन कल्पना काढिली, तर तिच्या सत्यासत्य-तेचा निर्णय करण्यासाठीं तिचा पाठपुरावा करणें ही गोष्ट त्याला दुरापास्तच होते. लोकमान्यांच्या ग्रंथाची त्यांच्या स्वतःच्या देशांत आजवर जी स्तुति झाली, ती बहुतेक मोघमच आहे. परतु त्यांच्या कल्पना खोट्या असतील तर त्या खोडून काढण्याचा किंवा खऱ्या असतील तर त्यांचा विकास कर-ण्याचा प्रयत्न शास्त्रीयरीत्या फारसा येथें झालेला दिसत नाहीं. समर्थांबरोबर जशा समर्थांच्या खास कल्पना विलीन झाल्या, तशा लोकमान्यांच्या या कल्पनाहि त्यांच्याबरोबर जातात कीं काय अशी भीति वाटते. या पुष्कळशा भीतीमध्यें जो आशेचा थोडासा तंतु आहे त्याचें स्वरूप आतां थोडक्यांत सांगतों.

## लोकमान्यांच्या कल्पनांचा पाठपुरावा

आम याकडे जे आंग्लभाषाभिज्ञ वैदिक किंवा पुराणविद्याकोविद पंडित आहेत त्यांतील बहुतेक स्वतंत्र बुध्दीचे नसून पाश्चात्यानुगामीच आहेत; त्यांनीं पाश्चात्य पंडितांच्या अनुमानांवर भिस्त ठेवूनच स्वतःचे विचार किंवा इतरांच्या विचारांवर टीका करण्याचें काम आजवर चालविलें आहे. तथापि मधून मधून कोठें कोठें देशी पध्दतीचा किंवा स्वतंत्र विचार करणारा माणूस क्वचित् दृष्टीस पडतो. अशांची संख्या निदान माझ्या माहितींतल्यांची तरी फार थोडी आहे. लोकमान्यांच्या कल्पनांचा थोडाबहुत पाठपुरावा करणारांमध्यें प्रो. वेंकटेश वामन सोहोनी, कै. वा. भाऊशास्त्री लेले, कै. शं. बा. दीक्षित, नानासाहेब पावगी, श्री. स. कृ. आठल्ये, कै. प्रो. आठवले इतकींच नांवें एतत् प्रांतीय लोकांचीं माझ्यापुढें दिसतात.

यांपैकीं प्रो. सोहोनी यांनीं आपल्या लेखांत लोकमान्यांच्या ध्रुव-स्थानोपपत्तीला अनुसरून चातुर्मासांतील व्रतवैकल्यांची व प्रबोधिनी एकादशीनंतर होणाऱ्या समाप्तीची उपपत्ति लाविली आहे. सूर्यनारायण हा श्रीविष्णूचें प्रतीक होय व श्रीविष्णु चार महिने निद्रिस्त असतो आणि त्याला कार्तिकी एकादशीला जागें करावें लागतें. तेव्हां त्याची श्रीस्वरूपी तुळशीची त्याशीं गांठ पडते अशी जी कल्पना आपल्या धर्मांत आहे,

चार महिने क्षितिजाखालीं राहून नंतर सृष्टीला प्रफुल्लित करीत उदयास येणाऱ्या ध्रुवमंडळस्थ सूर्याला अनुलक्षूनच मूळ उत्पन्न झाली असावी, अशा आशयाचें त्याचें विवेचन आहे.

कै० भाऊशास्त्री लेले यांनीं आपल्या धर्म साप्ताहिकांत लोकमान्यांच्या पहिल्या दोन पुस्तकांवर सर्वस्वी प्रतिकूल टीका केली आहे. पण ती सर्व एकदेशी आहे. 'वेद अनादि आहेत तर त्यांचा काळ कसला ठरवितां' अशा एकतंत्री कल्पनेवर तिची उभारणी झाला असल्यामुळें ती लोकमान्यांच्या मताची व त्यांनीं त्याच्या सिद्धयर्थ केलेल्या विवेचनाची चिकित्सा करण्याच्या कामीं निरुपयोगी आहे.

कै. दीक्षितांनीं लोकमान्यांचा पहिला ग्रंथ मात्र पाहिला होता. त्यांनीं त्यांतील मुख्य सिद्धान्त पूर्णपणें मान्य करून तो इतर प्रमाणांनींहि स्थापित होतो असें दाखविलें आहे; व शतपथ ब्राह्मणांतील कृतिकाविषयक स्पष्ट वचनांचा शोध लावून तर त्यांनीं या विषयांत मोठीच कामगिरी केली. श्री. चिंतामणराव वैद्यांनीं म्हटल्याप्रमाणें प्राचीन कालनिर्णयाच्या मार्गांतील हा एक मोठा दीपस्तंभच होय

लोकमान्यांच्या ध्रुववसतीच्या सिध्दांताला कांहीं अंशीं प्रतिकूल पण पुष्कळ अंशीं अनुकूल अशा कल्पना रा. नारायण भवानराव पावगी यांनीं केल्या आहेत. वैदिक ऋषि भूस्तर शास्त्राचे आदिजनक होत, सप्तसिंधूंचा प्रांत, इत्यादि लेखांत त्यांनीं लोकमान्यांच्या पुस्तकांतील प्रमेयांच्या आधारें आर्यांचें मूलस्थान भरतखंडच होय व त्यांनीं आपल्या पराक्रमानें ध्रुवापर्यंत वसाहती वसविल्या आणि ते प्रदेश वसतीस अयोग्य झाल्यावर त्यांनीं स्वगृहीं पुनरागमन केलें अशा आशयाचें पावगींनीं विवेचन केलें आहे.

लोकमान्यांच्या लेखांवरून तशा प्रकारचा विचार करण्याची स्फूर्ति आणखी रा. स. कृ. आठल्ये यांना झालेली आहे. कीर्तनमासिकाच्या पहिल्या वर्षाच्या अंकांत त्यांनीं 'ज्योतिषशास्त्र दृष्ट्या अवतारकल्पना.' या मथळयाखालीं एक निबंध लिहिला असून, ध्रुवस्थानीं निरनिराळे

तारकपुंज आले त्यामानानें निरनिराळ्या मत्स्यकूर्मादि अवतारांच कल्पना उद्भवल्या असें दाखविण्याचा प्रयत्न केला आहे. ध्रुवमत्स्य पुं. आकाशांच्या ध्रुवस्थानीं होता त्या वेळीं मत्स्यावतारकल्पना आली, त्या नंतर कॅसिओपिआ ऊर्फ कच्छपपुंज तेथें आला. हा काळ इ. सनापूर्व १२००० वर्षांच्या सुमाराचा होय. हा अवतार संपेपर्यंत आर्यलोक ध्रुवा जवळ होते. त्या वेळीं दुसरा हिमप्रलय तेथें झाल्यामुळें ते खालीं दक्षिणे कडे वळले, या समयास ध्रुवस्थानीं ड्रको ऊर्फ शिशुमार हा पुंज होता हाच वराहावतार होय. याचप्रमाणें नारसिंह अवताराचाहि ज्योतिषाशींच संबंध लावून रा. आठल्ये यांनीं पुढील अवतार मात्र ऐतिहासिक ठरविले आहेत. त्यांच्या या लेखांत कल्पनेचेंच साम्राज्य पुष्कळ व विवेचन जरा अव्यवस्थित आहे. तथापि ध्रुवोपपत्तीवरून विष्णु, इन्द्र इत्यादि देवता, स्वर्ग, पाताळ इत्यादि स्थानें इत्यादिकांची उपपत्ति लावण्याचा जो प्रयत्न केला आहे तो माझ्यामतें मोठा मनोवेधक आहे. शेषाच्या मस्तकावर पृथ्वी आहे, व तो पाताळांत असतो ही कल्पना दक्षिण ध्रुव म्हणजे शेष व दक्षिण गोलार्ध म्हणजे पाताळ असें समजून उत्तर ध्रुवावर आपण आहों असें कल्पिल्यास फार सुंदर रीतीनें उलगडते. रा. आठल्ये यांच्या कांहीं कल्पनांमुळें ध्रुवोपपत्तीला पुष्कळ बळकटी येईल असें मला वाटतें व त्यांचा लेख अधिक सोपपत्तिक होऊन या विषयावर अधिक प्रकाश पडावा अशी तो वाचून कोणालाहि इच्छा होईल.

लोकमान्यांच्या उपपत्तीचें ग्रहण करून तत्संबंधीं अधिक निश्चित स्वरूपाचीं अनुमानें करण्याचा प्रयत्न इंदूर कालेजांतील माजी संस्कृताध्यापक प्रो. आठवले यांनीं आपल्या श्रौतभूमि नामक छोट्या पुस्तकांत केला आहे. यज्ञांतील पृष्ठ्य, चतुर्विंश, इत्यादि पारिभाषिक संज्ञाचें ध्रुवोपत्तीच्या आधारावर त्यांनीं याथार्थ्य दाखवून ध्रुवमंडळांत कोणत्या अक्षांशावर विशेष लोकवस्ती होती हें गणिताधारें ठरविण्याचा यत्न केला आहे. हा मूळ ग्रंथ इंग्रजींत असून त्याचा गोषवारा मी आर्टिक होम इन धि वेदाजच्या भाषांतरास शेवटीं जोडिला आहे.